
# राष्ट्रनिर्माते
# डॉ.बाबासाहेब आंबेडकर

आजादी का अमृत महोत्सव

2021-2022



संपादक

**डॉ. डोंगरे एल.बी.**

# अनुक्रमणिका


१) डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे मुल्यगर्भ शैक्षणिक विचार
**डॉ अर्जुन गंगाराम नेरकर** 8

२) डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रवादी आर्थिक विचार
**प्रा.डॉ. उत्तम अप्पासाहेब पठारे** 13

३) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजीक समतेचे विचार
**प्रा. संतोष सुखदेव ठाकरे** 17

४) डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीमुक्तीवादी विचार
**प्रा.एस.पी. उमरीवाड** 26

५) डॉ बाबासहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना
**प्रा. कौसल्ये एस.जी.** 34

६) भारतीय राज्यघटना आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर
**प्रा. अर्जुन मोरे** 43

७) डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही संबंधीचे विचार 48
**प्रा.आनेराव एम.एम.**

८) शेतकऱ्यांचे हितकरी - डॉ बाबासाहेब आंबेडकर 53
**डॉ विजयकुमार बाबळे**

९) डॉ बाबासाहेब आंबेडकर भारतीय संवीधानाचे शिल्पकार 57
**डॉ पी.एस.लोखंडे**

१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार... 62
**प्रा. लक्ष्मण एस. पवार**

११) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, शैक्षणिक, 75
आर्थिक विचार - **प्रा. डॉ. मनोहर कुंडलिक थोरात**

१२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार 82
**बोंबले राजू बालासाहेब**

१३) डॉ. आंबेडकरांचे सामाजिक लोकशाहीसंबंधी विचार 91
**प्रा.डॉ. माधव केरबा वाघमारे**

१४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परराष्ट्र धोरण एक विश्लेषण 95
**प्रा. डॉ. डोंगरे एल.बी.**

१५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मविषयक विचार आणि धर्मांतर 104
**डॉ. डी. के. कदम**

# 15) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्माविषयक विचार आणि धर्मांतर

**डॉ.डी.के.कदम**

(समाजशास्त्र विभाग प्रमुख)

हु.ज.पा.महाविद्यालय, हिमातनगर,जि. नांदेड

मो.नं.9767459754

---

जाती व्यवस्था हे भारतीय. समाजाचे महत्त्वाचे वौशिष्टे आहे डॉ.बाबासाहेबांनी भारतीय समाजाचा सखोल अभ्यास केला व भारतीय समाजातुन जातीय्र व्यवस्थेतुन निर्माण झालेल्या अस्पृश्य, अस्पृश्यतेचे चित्रण अतिशय विधारक असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. तेंव्हा पासुनच त्यांनी अस्पृश्यता निर्मुलन करण्याचे ठरविले प्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यतेचे मुळ कोठे आहे यांचा शोध घेतला. भारतीय अस्पृश्यतेचे मुळ हे हिंदू धर्मात आहे ही बाब स्पष्ट झाली म्हणुन बाबासाहेब म्हणतात अस्पृश्यता ही नौमितीक नसुन नित्याची आहे. कारण स्पृश्य आणि अस्पृश्य यामधील कलह नित्याचा आहे. तो त्रिकालाबाधीत राहणार आहे. कारण ज्या धर्मामुळे तुम्हाला खालची पायरी दिली आहे. स्पृश्य आणि अस्पृश्य हा कलह कायम राहणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता नष्ट करुन समता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी धर्मांतर करण्याचा निश्चय केला इ.स. 1936 ला हिंदू धर्माचा त्याग करण्याची घोषणा केली.

प्रस्तुत शोध निबंधात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्म विषयक विचार आणि धर्मांतर हा या विषयाचा उवापोह केला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराचा विचार करण्यास अस्पृश्यतेने भाग पाडले हे स्पष्ट दिसून येते. कारण अस्पृश्यता ही पराकोटीला पोहचली होती. अस्पृश्यतेमुळे तुमच्यावर होत असलेल्या जुलमाची जाणीव करुन देणे आवश्यक आहे. त्यांनी अस्पृश्यते विदारक स्वरुप स्पष्ट केले सरकारी शाळेत जाण्याचा, सार्वजनिक विहीर पाणी भरण्याचा, घोड्यावर वरात काढण्याचा हक्क मागितला तर स्पृश्य हिंदूंनी बेदम मारहान केलचे अनेक उदाहरणे आहेत. डॉ.बाबासाहेब एवढ्यावर थांबले नाहीत तर अस्पृश्यांनी दागदागिने, उच्च प्रतीची पोशाख, वरात किंवा पाणि भरण्यासाठी पितळ तांब्याची भांडी वापरल्यामुळे, बुटबुट वापरणे, पायात मौजे घालणे, जमिन खरेदी करणे, हिंदूच्या समोर जोहर न घालणे, शौचालाजातांना तांब्यात पाणी नेवू न देणे, पंचाच्या पंक्तीत जेवणास बसल्यास मारहाण झाल्याचे घोर जुलम करुन तुम्हाला हिन वागणुक मिळते ही अस्पृश्यांची वास्तव स्थिती हिंदुस्थानात आहे याची जाणीव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी करुन दिली. स्पृशांना उच्च पोशाख घोड्यावर वरात काढणे जो काही करु शकतो तेच तुम्हाला करता येत नाही. कारण तुम्ही खालचे आहात, अपवित्र आहात, तुम्ही खालच्या पायरीनेच राहिले पाहीजे तुम्ही जर पायरी सोडण्याचा प्रयत्न केलात तर तुमच्यावर अन्याय अत्याचार करुन कलहाला सुरु होते हे निर्विवाद सत्य आहे कारण ते तुम्हाला समतेची वागणुक देत नाहीत. धर्मामुळे तुम्हाला खालचे स्थान (पायरी) दिली आहे. त्यात कोणताही बदल होण्याचा संभव होणार नाही यामुळे स्पृश्य अस्पृश्यता यांच्यामधील कलह कधीही संपणार नाही तो कलह कायमचा राहील हे डॉ.बाबासाहेबांनी स्पष्ट करुन दाखवले. त्यांनी पुढे

पुढे सांगितले स्पृश्य अस्पृश्यता कलह तो कायमचा असुन त्या कलहात तुमचा कधीच निभाव लागणार नाही. कारण कलहात जिंकण्यासाठी ज्या गटात सामर्थ्य असते तो गट जिंकतो मानवाकडे तीन प्रकारचे सामर्थ्य असावे लागते. मनुष्यबळ, द्रव्यबल, मानसिकबळ या तीन बलापौकी कोणतेही बल तुमच्याकडे नाही. कारण अस्पृश्यांची संख्या अल्पसंख्याक असुन ते खेडोपाडी विखुरलेली आहे ती संघटीत नाही द्रव्य बळाचा विचार केला तर द्रव्य बळ अजिबातच नाही. कारण अस्पृश्यतेमुळे तुम्हाला व्यापार नाही, उदीम नाही, नौकरी नाही, शेती नाही. जे काही काम आहे ते निकृष्ट दर्जाचे आहे. तुमची उपजिवीका स्पृश्य वर्गावर अवलंबुन आहे. आज तुमच्या वर अन्याय अत्याचार झाला तर कोर्टात दाद मागण्यासाठी पौसा नाही, येथे हजारो लोक कोर्टात जाण्यासाठी, दाद मागण्यासाठी पौसा नाही म्हणुन हिंदू धर्मात होणारा त्रास, विटंबना व जोर जुलुम अगदी निमुटपणे,मुकाट्याने सहन करतात ही वास्तव बाब आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मानसिकतेला अतिशय महत्त्वाचे स्थान दिले आहे. ·मानसिक बळ अतिशय बळकट असते परंतु अस्पृश्य महार जातीत मानसिक बलाची उणिव आहे कारण स्पृश्य वर्गाची सेवा करण्यात अस्पृश्यांची शेकडो वर्षे गेली. अन्याय अत्याचार विटंबना छि-थु शेकडो वर्षे शेकडो वर्षे निमुटपणे सहन केली त्यामुळे त्यांची मानसिकता सिन झाली आहे. त्या स्पृशांच्या विरुद्ध बोलण्याची, अन्याय प्रतिकार करण्याची हिंमत नाहीशी झाली आहे. तुम्ही हताश होवुन निराशेचे व नामर्दुमकीचे वातावरण सर्वत्र पसरले आहे ह्या वस्तुस्थितीचे वर्णन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते तुमच्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराचा दुःखाचा, जाती बंधनाचा कोणीही विचार करत नाही. त्यातून बाहेर पडण्यासाठी तुम्हाला विचार करावा लागणार यासाठी तुम्हाला धर्मांतर करून जगण्यासाठी अन्य धर्माचा विचार करावा लागेल हे निर्विवाद सत्य आहे.

डॉ.बाबासाहेबांनी धर्मांतर करण्यापूर्वी मानवाच्या धर्माची आवश्यकता काय आहे धर्म कशाकरता असतो त्याची आवश्यकता काय हे अगोदर जाणुन घेतले होते. ज्यांनी सर्व प्रजेची धारणा होते तो धर्म ही धर्माची व्याख्या हे मान्य करतात व समाजाच्या धारणे करिता घातलेली धर्मबंधने म्हणजे धर्म होय परंतु ही कल्पना समाजात त्या बंधनाने प्रजेची धारणा होवु शकते परंतु हिंदू धर्माने प्रजेची धारणा करतांना भेदाभेद केला आहे. एकाच धर्माची शिकवण सर्वांना समान नाही कारण हिंदू धर्मात एका वर्णानी विद्या शिकावी दुसऱ्या वर्णाने शस्त्र धरावे, तीसऱ्यानी व्यापार करावी शेवटच्या वर्णाने तुमची सेवा करावी असा धर्म मला मान्य नाही. हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले. अर्थ घटक सर्व मानवाच्या उपजिवीकेसाठी आवश्यक आहे शस्त्र प्रत्येकाला आवश्यक आहे. विद्या प्रत्येकाला आवश्यक आहे. परंतु हिंदू धर्मात एकाला सज्ञान केले जाते दुसऱ्याला अज्ञानात ठेवणे. एकाच्या हाती शस्त्र देणे व दुसऱ्याला निःशस्त्र करतो म्हणून हा धर्म काहींना बौद्धीक गुलामगीरित ठेवतो तो धर्म काहींना धन संपादनाचा मार्ग मोकळा ठेवतो व बाकीच्यांना आपल्या उपजिविकेकरीता दुसऱ्यावर अवलंबुन राहण्याची व्यवस्था करतो हा अस्पृश्यांसाठी धर्म नसून स्वार्थ परायण आहे स्पष्ट आहे. म्हणुन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट धर्म

सांगितले आहे की, धर्म हा व्यक्तीच्या आत्मोन्नतीला पोषक असे वातावरण उत्पन्न करणे ही मुलभूत कल्पना आहे परंतु हिंदू धर्मात तुमची आत्मोउन्नती कधीही होणार नाही. म्हणुन धर्मांतराशिवाय दुसरा पर्याय नाही. हा विचार स्पष्ट मांडला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्तीच्या विकासाला सहानुभूती समता आणि स्वातंत्र्य तीन गोष्टी ची आवश्यकता आहे. परंतु या तीन्ही गोष्टी तुमच्यासाठी हिंदू धर्मात नाहीत. हिंदू धर्मात तुम्हाला सहानुभूतीने वागवले असे एकही उदाहरण नाही. हिंदू लोकांना जितके मुसलमान जवळचे वाटतात हिंदु अस्पृश्यांना सहानुभूतीने वागणूक देत नाहीत. उलट त्यांचा विघातक दृष्टी कोण आहे हिंदू लोकांमध्ये तुमच्याबद्दल कोणत्याही प्रकारची सहानुभूती नसल्याकारणाने ते आपल्या अधिकाराचा उपयोग करु शकत नाहीत. हिंदू धर्मातील अस्पृश्य लोकात तुमच्या विषयी शत्रुत्व भरलेले आहे. अशा सहानुभूती नसलेल्या वातावरणात राहून तुमचा काहीही उपयोग होणार नाही म्हणुन धर्मांतराचा पर्याय समोर ठेवतात. धर्मांतराचा विचार करतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समतेला अतिशय महत्त्व दिले आहे. त्यांच्या मते हिंदू धर्मात समानता नाही. समतेचा अभाव आहे. कारण ख्रिश्चन आणि मुसलमान धर्मात जी समानता आहे ती समानता तुम्हाला मिळत नाही. हिंदू धर्मातील अस्पृश्यता ही मूर्तिमंत असमानताच आहे. एवढी मोठी भयानक असमानतेची जागती ज्योत कोठेच दिसनार नाही. जगाचा इतिहास पडतानून पहा अस्पृश्यते पेक्षा उच्च स्वरुपाची असमानता जगात हिंदू धर्म हेच असमानता निर्माण करण्याचे कारण आहे. डॉ.बाबासाहेब म्हणता खेडगावात कमालीची अस्पृश्यता होती.

एखादा स्पृश्य माणूस उपवास धरून असेल आणि त्यावेळी एखाद्या अस्पृश्य महार माणसाचा आवाज त्याच्या कानी पडला तर तो अन्न ग्रहण करत नाही. त्यांच्यापैकी काही लोकांनी मुसलमान धर्म स्विकारला त्यांना हिंदू लोक अस्पृश्य मानत नाहीत या पुष्टीकरणासाठी तेंव्हा घडलेल्या त्रावणकोर येथील घटनेचा संदर्भ देतात त्रावणकोर येथील थीया ही जात अस्पृश्य होती. त्यांना रस्त्यावरून चालण्यास मनाई होती परंतु त्यांतीलच काही लोकांनी शिख धर्माचा स्विकार केला तेंव्हा त्यांच्यावरची अनेक बंधने उठवली गेली. याची जाणीव जागृती धर्मांतरापुर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांना करून दिली. ज्या धर्मात मनुष्यत्वाला व त्याच्या माणुसकीला काही किंमत नाही तो धर्म कामाचा नाही. तो हिंदू धर्म मांजरा, कुत्र्याला जवळ करतो माणसाला दुर लोटतो तो आमचा धर्म नाही असा क्रांतीकारक विचार धर्मांतर करण्यापुर्वी मांडला. हिंदू धर्मातील लोक दांभीक आहेत. त्यांच्या मुख में राम बगल में छुरी आहे बोलने महानुभवाचे करणी ही कसाबाची आहे. पशु पक्षाला देव मानण्याचा आव आणणारे, माणसांना पाण्यावाचुन मारणारे हे दांभीक आहेत त्यांचा संग करु नका हे आपणास हिन मानुस मानुन असमानतेची वागणुक देतात. ही अपमान कारक परिस्थिती टाळण्याकरीता हा कलंक धुवून टाकण्या करीता नरदेहाची चिज करण्याकरीता जर कोणता उपाय असेल तो म्हणजे हिंदू धर्माचा किंवा हिंदू समाजाचा त्याग करणे हा होय.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्मात स्वातंत्र्य नाही याची जाणीव करुन दिली म्हणजेच महार जातीला हिंदू धर्माने मानसिक स्वातंत्र्य हिरावुन घेतले बौद्धीक गुलामगिरीत ठेवले हिंदू धर्माने अस्पृश्य

वर्गाला दुसऱ्याला हुकूमत गाजविण्याचा अधिकार दिला हिंदू धर्म वरिष्ठ वर्गाच्या संवर्धनाकरीता आहे. ज्याला ते धर्म म्हणतात त्या धर्माने तुम्हाला गुलामगीरीची भुमीका दिलेली आहे. त्या गुलामगीरीतून बाहेर पडण्याचा एकच मार्ग तुम्हाला जर स्वातंत्र्य हवे असेल तर तुम्हाला धर्मांतरच केले पाहिजे असा ठाम विचार बाबासाहेबांनी मांडला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील अस्पृश्यता आणि त्यांच्यावर होणारा स्पृश्य हिंदू कडून अन्याय अत्याचार सांगितला नाही तर त्यांची आत्मोन्नती कोणत्या धर्माने होईल, कोणता धर्म सहानुभूती, समता, स्वातंत्र्य प्रधान करु शकतो याचा विचार केला व जगातील प्रमुख धर्माचा अभ्यास करुन एक-दोन वर्षे नव्हे 20-21 वर्षांनी धर्म निवडला कारण धर्मांतर करतांना अनेक पर्याय होते. परंतु जो धर्म अस्पृश्यतेला नष्ट करेन आणि भारतीय अखंडता राखेल याचे विचार केल्याचे दिसुन येते.

डॉ. बाबासाहेबांनी आपले विचारातून स्पष्ट केले की, मानुस हा धर्माकरीता नाही धर्म करिता हा मानसाकरिता आहे. काही धर्मांतर विषयी विचार मांडले ते पुढील प्रमाणे.

1. माणुसकि प्राप्त करुन घ्यायची असेल तर धर्मांतर करा.
2. संघटना करावयाची असेलतर धर्मांतर करा.
3. सामर्थ्य संपादन करावयाचे असेल तर धर्मांतर करा.
4. समाता प्राप्त करुन घ्यायची तर धर्मांतर करा.
5. स्वातंत्र्य प्राप्त करुन घ्यायची तर धर्मांतर करा.

८.     संसार सुखाचा करायचा असेल तर धर्मांतर करा. जो धर्म तुमच्या मानुसकिला काही किंमत देत नाही तो धर्म तुम्हचा नाही. हे स्पष्ट केले आणि बौद्ध धर्माचा स्विकार केला.

बौद्ध धर्मात स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि समाजिक न्याय यांना महत्त्वाचे स्थान आहे. बौद्ध धर्म मानवाच्या विकासासाठीचा मार्ग आहे. चार आर्य सत्ये म्हणजे दुःखांची जाणीव करुन देणारी, त्या दुःखावर मात करुन संपुर्ण मानवी समाज हा सुखी होवु शकतो असा आर्य अष्टांगिक मार्ग म्हणजे सम्यकदृष्टि, सम्यक संकल्प, सम्यक वाचा, सम्यक कर्म, सम्यक उपजीविका, सम्यक व्यायाम, सम्यक स्मृती, सम्यक समाधी या आठ पायऱ्यांचा समावेश बौद्ध धर्मात आहे.

प्रज्ञा, करुणा, ज्ञान, शील, त्याग व संयम ही तत्त्वे बौद्ध धर्मात आहेत. बुद्धांनी सांगितलेल्या बुद्धावाद सदसद विवेक मानवतावादी धर्म समाजात समता निर्माण करणारा होता. तसेच बौद्ध धर्माचा प्रज्ञा,शील, समाधीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. शील, नौतिक दृष्टिने चांगले चरित्रशील, चांगली वागणुक, जिच्यामुळे स्वतःच्या उन्नतीबरोबर समाजाची सुद्धा उन्नती होईल. शीलपालन करण्यामध्ये सुद्धा बुद्ध मध्यममार्गाचे पालन होते. बौद्ध धर्म हा पुर्णपणे नौतिकतेने भरलेला आहे. अस्पृश्य दलित समाजाच्या उत्थानासाठी इतर तत्त्वज्ञानापेक्षा बौद्ध तत्त्वज्ञान श्रेष्ठ आहे. हे पटल्यानंतरच डॉ.बाबासाहेबांनी बौद्ध धर्माचा स्विकार केला.

संदर्भ :-


1. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर : मुक्तीकोन पथे ? : प्रकाशक डॉ.प्रदिप रोडगे लष्करी बाग डॉ.आंबेडकर कॉलनी नागपूर
2. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर : शेड्युल कॉस्ट च्या तक्रारी ? : प्रकाशक डॉ.प्रदिप रोडगे लष्करी बाग डॉ.आंबेडकर कॉलनी नागपूर
3. डॉ.बाबासाहेब आंबेडकर : लेखन आणि भाषणे खंड
4. डॉ.डी.डी.बंदिष्टे : गौतम बुद्धाचा धम्मच जगाला वाचवू शकेल, एक्सप्रेस पब्लिकेशन हाऊस कोल्हापूर.
5. डॉ. सौ.ज्योती डोईफोडे, भारतीय समाजातील प्रमुख धर्म, कल्पना प्रकाशन नांदेड.